बीड । शनिवार
०५.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : ९५
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 



# नगरपालिकेचे भ्रष्ट कारभारी किरण देशमुख यांच्या पाठीमागे चौकशी लागणार

## बोगस बिले काढण्यात महारथ ; चौकशीच्या फेऱ्यात सगळच निघणार

## संघटनांच्या तक्रारी ; वरिष्ठ अधिकारी करणार तपासणी

## कार्यालयात न येता बिले काढली कशी ; कोट्यावधी रुपयांची बिलांची होणार चौकशी !

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेत नगरपालिका फंडातून बोगस बिले काढत कोट्यावधी रुपयांची बिले मंजूर केले जात असून बिल काढताना निव्वळ सर्व सामान्य बिडकर यांच्य कराच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या अधिकाऱ्यांची आता खैर नाही. नगरपालिकेत सुरू असलेला भ्रष्ट कारभाराच्या विरोधात काही सामाजिक संघटना आक्रमक झाले आहेत. वरिष्ठ पातळीवर अधिकाऱ्यांची तक्रार व चौकशी करण्याची मागणी करण्यात आली असून लवकरच नगरपालिकेत आपले हात गरम करणाऱ्या अधिकाऱ्यांना दिवसा तारे दिसणार आहेत.

नगरपालिका विभागातील बांधकाम विभाग हा सोयीचा बनला आहे या ठिकाणी शहरातील विविध विकास कामांच्या नावाखाली न प फंडाची कशी वाट लावली जाते याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे बांधकाम विभाग होय. या ठिकाणी कार्यरत असणारे अधिकारी कर्मचारी यांना बीड शहरातील विकासाचे कोणतेच देणे घेणे लागत नसल्याने बिले काढताना आपला कसा फायदा होईल याकडे या अधिकाऱ्यांचे खास लक्ष असते. बीड शहरात विविध विकास कामे करताना ओरिजिनल कामासह बोगस कामाची यादीही बिलामध्ये जोडली जाते. विविध मजूर सहकारी सोसायटी व संस्थेमार्फत शहरातील विविध भागात कामे केली जातात अद्यापही शहरातील अनेक भाग विकासापासून वंचित आहेत. यामध्ये विशेष म्हणजे शहरातील चार प्रभाग दलित वस्ती अंतर्गत येतात. या फंडातही मोठ्या प्रमाणात अफरातफर झाली आहे . कामे मंजूर एका ठिकाणी व केली जातात दुसऱ्या ठिकाणी अशा अनेक तक्रारी यापूर्वीही झालेले ▶▶ उर्वरित पान २ वर

# स्थानीय गुन्हे शाखा व AHTU यांची संयुक्त कारवाई

## बीडमध्ये वेश्याव्यवसायावर छापा; दोन महिलांची सुटका



**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखा व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (कढण) यांच्या संयुक्त पथकाने बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील धानोरा रोड येथील तक्षशिला नगर परिसरात वेश्याव्यवसायावर मोठी कारवाई करत दोन महिलांची सुटका केली.

दिनांक ३ जुलै २०२५ रोजी कढण कक्ष बीड येथे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, तक्षशिला नगर येथील भगवान विद्यालयाच्या मागील बाजूस दोन महिला वेश्याव्यवसाय करत असून, बाहेरून महिला बोलावून त्या ग्राहकांकडून पैसे घेऊन अश्लील व्यवसाय करीत आहेत.

सदर माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना कळवण्यात आली. यानंतर पोलीस निरीक्षक शिवाजी धोंडीबा बंटेवाड यांना लेखी आदेश देण्यात आला. त्यांनी स्थानिक गुन्हे शाखा व कढण टीमसह डमी ग्राहक व पंचांच्या मदतीने सापळा रचून छापा टाकला.

डमी ग्राहकाने तेथे उपस्थित एजंट महिलेला संपर्क साधला असता तिने वेश्याव्यवसायासाठी १५०० रुपये मागणी केली.

▶▶ उर्वरित पान २ वर

# लैंगिक छळप्रकरणी ३० जणांची चौकशी, आरोपींना केबिनमध्ये नेऊन सीन रिक्रिएशन

**बीड । प्रतिनिधी**

अल्पवयीन विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणात अटकेतील क्लास संचालक विजय पवार आणि शिक्षक प्रशांत खाटोकर यांचे उत्पन्नाचे स्रोत पोलिस तपासत आहेत. या दरम्यान झालेल्या तपासात संचालक विजय पवारने कर वाचवण्यासाठी खाटोकरला वेगळ्या क्लासचा मालक दाखवल्याचे समोर आले आहे. क्लासेसच्या शिक्षकांचे हजेरी पुस्तक, सुट्यांच्या नोंदी, विद्यार्थ्यांची हजेरी या बाबींचे रेकॉर्ड त्यांनी ठेवलेले नाही. उमाकिरण शैक्षणिक संकुलात 'नीट' ची तयारी करणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीचा पवार



आणि खाटोकर यांनी एक वर्ष लैंगिक छळ केला. दोन्ही शिक्षकांचे उत्पन्नाचे स्त्रोत पोलीस तपासले जाणार आहेत. आतापर्यंत याप्रकरणी पोलिसांनी ३० जणांचे जबाब नोंदवले असून पीडितेच्या मैत्रिणी, कुटुंबीय, क्लासमधील काही जणांचा समावेश आहे. पोलिसांनी खाटोकरची दुचाकी जप्त केली असून दोघांचे मोबाइल, टॅब, लॅपटॉपही जप्त केले आहेत.

तर क्लासमध्ये ४० सीसीटीव्ही कॅमेरे असून त्यांचे डीव्हीआर जप्त केले आहेत. यात २० दिवसांचा डेटा आहे. मात्र घटना वर्षभराची असल्याने जुना डाटा रिकव्हर करण्यासाठी डीव्हीआर फॉरेन्सिक लॅबला पाठवले जाणार आहेत. आरोपी शिक्षकांसोबत पोलिस घटनेचे रिक्रिएशन करणार यातील पीडितेने घटनास्थळ दाखवले असून त्याचा पंचनामा झालेला आहे. याबाबत पीडितेने न्यायालयातही जबाब दिलेला आहे. आता पोलिस दोन्ही आरोपी शिक्षकांना सोबत घेऊन घटनेचे रिक्रिएशन करण्याची तयारी करत आहेत. नेमकी घटना कशी घडली? त्यात कशाप्रकारे आरोपींनी कायदा मोडला? कोणत्या बाबी सीसीटीव्हीत नोंद झाल्या? याची माहिती घेण्यासाठी पोलिस

▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हातिल जवळपास सर्वच शिवभोजन केंद्र बोगस!

## जिल्हाधिकाऱ्यांनी श्री हॉटेल सिल करण्याचे दिले आदेश



**बीड । प्रतिनिधी**

गरजूंना अल्पदरामध्ये जेवण मिळावे यासाठी राज्य सरकारने राज्यभरात शिवभोजन योजना सुरू केली. या योजनेचा इतर ठिकाणी गरजूंना फायदा जरी होत असला तरी या योजनेचा बीड जिल्ह्यामध्ये मात्र बोजवारा उडाला आहे. शिवभोजन थाळीच्या नावाखाली बीड जिल्ह्यात फक्त कार्यकर्ते पोसण्याचे काम होत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील श्री हॉटेल याठिकाणी सुरू असलेल्या शिवभोजन योजनेचे दिवसाचे टार्गेट कसे पूर्ण होते याचा एक व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्राने बीड जिल्ह्यात कशाप्रकारे शिवभोजन थाळीची सत्यता पाहिली आहे. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी श्री हॉटेल सिल करण्याचे आदेश दिले आहेत. सध्या हे हॉटेल सील असून पुढील आदेश येईपर्यंत हॉटेल सिलच राहणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ज्याप्रकारे ही कारवाई केली तशीच जिल्ह्यातील इतरही शिवभोजन केंद्रांची संबंधित विभागाने पाहणी करण्याचे आदेश देवून मागील दोन वर्षापासून कशाप्रकारे बोगस बिले उचलले याचीसुद्धा पाहणी करावी म्हणजे सर्व

▶▶ उर्वरित पान २ वर

# महिला व बालविकास विभागाचा तुघलकी कारभार

## ▸ जिथं शाळांनाच ईमारती नाहीत ; म्हणे अंगणवाडीचे शाळेत स्थलांतर करा
## ▸ निधीअभावी सरकारकडून पळवाट तर ५५ कोटींचा प्रस्ताव धुळखात पडुन

**बीड । प्रतिनिधी**

ज्या अंगणवाडी केंद्राना स्वतःची इमारत उपलब्ध नाही अशी अंगणवाडी केंद्रे नजीकच्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये स्थलांतरित करण्याबाबत महिला व बालविकास विभागाने दि.२ जुलै रोजी अध्यादेश काढला आहे.परंतु अध्यादेश काढण्यापुर्वी जिल्हा परिषदेच्या शाळांना तरी पुरेशा इमारती आहेत का?? सुस्थितीत आहेत का? सुरक्षित आहेत का? याचा विचार केलेला नाही. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन त्याठिकाणी



अध्यापन करू नये असे शिक्षण विभागाने कळविले असुन ७४९ वर्गखोल्यांची किरकोळ दुरुस्ती तर ८५६ वर्गखोल्यांना मोठ्या दुरुस्तीची गरज असल्याचे म्हटले आहे. जिल्हा परिषदेच्या मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या तर काही ठिकाणी झाडाखाली, समाज मंदिर, चावडीत बसुन शिक्षण घेत आहेत.आता या आदेशामुळे शासनाचा तुघलकी कारभार समोर आल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र ▶▶ उर्वरित पान २ वर

# आषाढी एकादशीनिमित्त 'अभंगवाणी' कार्यक्रम



**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बीड शाखा, बालरंगभूमी परिषद आणि सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (काकू) महाविद्यालयातील संगीत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त 'अभंगवाणी' हा भक्तिसंगीत गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती नाट्य परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी दिली. हा कार्यक्रम आज (दि.५) सकाळी ११ वाजता सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे. यात बीड

▶▶ उर्वरित पान २ वर

# महाराष्ट्रात पुन्हा संतोष देशमुख प्रकरणाची पुनरावृत्ती;

## सरपंचाचा मुंडकं छाटलेला मृतदेह आढळला!

**बुलढाणा । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून राज्यामध्ये गुन्हेगारी घटनांचे प्रमाण वाढल्याचे पाहायला मिळत आहे. बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण प्रचंड गाजलं. त्यानंतर आता देशमुख यांच्या निर्घृण हत्येसारखीच घटना बुलढाणा जिल्ह्यातील लोणार या शहरात ▶▶ उर्वरित पान २ वर




# बीड मौलाना आझाद महामंडळात कर्मचाऱ्यांनी लाखोंचा भ्रष्टाचार करुन मालामाल झाले: प्रा सापनकर

**बीड । प्रतिनिधी**

मौलाना आझाद व अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे गंभीर प्रकार समोर आला आहे शासनाने अल्पसंख्यांक व आर्थिक दुर्बळ घटकासाठी कर्ज पुरवठा योजना स्थापन केली आहे या महामंडळातील काही कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी आपल्या घरातील नातेवाईक व मित्र कंपनींना कर्ज दिले आहे शासकीय कर्मचारी कागदपत्रे प्रक्रियेचा आधार न घेता अपूर्ण कागदपत्रांच्या आधारे या योजनेचा लाभ घेताला आहे गोरगरीब गरजूंना डावलून




स्वतःचा खिशा भरण्यासाठी या कर्मचाऱ्यांने नातेवाईकांना सर्रास कर्ज मंजूर करून दिले आहे गोरगरिबांच्या हक्का वर गदा आणला आहे मौलाना आझाद महामंडळात अनेक अल्पसंख्यांक गरजू आणि आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना कर्ज दिले जात नाही गोरगरिबांना कर्ज घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कागदपत्राची मागणी केली जाते व खऱ्या गरजूंना डावलून कोट्याधीश रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे हा प्रकार राज्याचे अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे साहेब यांच्याकडे भ्रष्टाचारी अधिकारी यांची चौकशी झाली पाहिजे ▶▶ उर्वरित पान २ वर



# ‘माये’चं दूध... नवजातांसाठी संजीवनी!

## ● जळगावच्या ‘ह्युमन मिल्क बँके’तून २000हून अधिक बाळांना जीवनदायी आधार

आईपण म्हणजे माया, वात्सल्य आणि त्याग. पण काही वेळा ही आई काही कारणांमुळे बाळाला दूध पाजू शकत नाही – आजारपण, अति कमी वजनाचं बाळ, किंवा अगदी अनाथत्व. अशा वेळी ‘ह्युमन मिल्क बँक’ म्हणजे त्या नवजातासाठी जीवदान ठरतं. जळगाव जिल्हा सामान्य रुग्णालयातील (सिव्हिल हॉस्पिटल) ‘ह्युमन मिल्क बँक’ हे त्याचं अत्युत्कृष्ट उदाहरण ठरतं आहे. मार्च २०२४ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमात आजपर्यंत १८४६ मातांनी स्वखुशीने दुग्धदान केलं असून, २००० हून अधिक नवजात बाळांना सुरक्षित, आरोग्यदायी दूध मिळालं आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या समोर या अभिनव उपक्रमाची संकल्पना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी मांडली, पालकमंत्री, जिल्ह्यातील सर्व मंत्री, लोकप्रतिनिधी यांना संकल्पना आवडली, तर प्रत्यक्षात त्याची अंम




लबजावणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. किरण पाटील यांच्या पुढाकारातून झाली. मुलांच्या आरोग्याच्या बाबतीत कोणताही पर्याय स्वीकारण्यासारखा नसतो. त्यांच्या गरजा लक्षात घेऊन हा उपक्रम उभा राहिला आहे, असं डॉक्टर पाटील सांगतात. मातेचे दूध म्हणजे फक्त अन्न नव्हे, ती जीवनरेषा आहे – असे सांगत प्रमुख जयश्री पाटील आणि डॉ. शैलजा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली





कार्यरत मिल्क बँकची पाच सदस्यीय टीम समुपदेशन व सेवा कार्यात समरस आहे.

‘ह्युमन मिल्क बँक’ म्हणजे काय?

‘ह्युमन मिल्क बँक’ ही अशा प्रकारची सुविधा आहे जिथे नवजात बाळांसाठी आईच्या दुधाचा पर्याय म्हणून दुसऱ्या आरोग्यदायी स्त्रीचे दूध गोळा करून सुरक्षितरीत्या साठवले जाते आणि गरजूंना दिले जाते. ही संकल्पना विशेषतः अशा बाळांसाठी उपयुक्त ठरते, ज्यांच्या मातेला कोणत्याही कारणामुळे थेट स्तनपान करता येत नाही – जसे की अकाली बाळंतपण, आईचे आजारपण, मृत्यूनंतर किंवा दूध कमी असणे इत्यादी.

कशी कार्य करते ह्युमन मिल्क बँक?

दुग्धदान (Milk Donation): निरोगी स्त्रियांनी (आईंनी) त्यांच्या बाळाला दूध पाजून उरलेले दूध स्वेच्छेने या बँकेत दान केले जाते. त्यासाठी महिलांची वैद्यकीय तपासणी होते, त्यांच्या आरोग्याचा इतिहास तपासला जातो.

दूध संकलन व तपासणी: संकलित दूध हे प्रमाणित प्रक्रियेनुसार पाश्चराइज (अती उष्ण व अती शीत)केले जाते. त्यामुळे त्यातील जंतू, बॅक्टेरिया नष्ट होतात.

साठवण व वितरण: हे दूध विशेष थंड तापमानात डीप फ्रीझरमध्ये साठवले जाते. गरजूंना – विशेषतः NICU (नवजात अतिदक्षता विभाग) मधील कमी वजनाच्या बाळांना – डॉक्टरांच्या सल्ल्याने दिले जाते.

का आहे ही गरज? अनेक वेळा अकाली जन्मलेल्या किंवा कमकुवत बाळांना प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि पचनासाठी आईचे दूधच सर्वोत्तम असते. पण काही प्रसंगी आई दूध देऊ शकत नाही, अशा वेळी दुसऱ्या महिलांचे दूध अत्यावश्यक ठरते. हे दूध बाळाच्या जीवितासाठी महत्त्वाचे ठरते. त्यामुळे ह्युमन मिल्क बँक म्हणजेच आईच्या मायेचा एक सामाजिक विस्तार म्हणता येईल.

फायदे: बाळाचा आरोग्य विकास योग्य होतो. मृत्यू दरात घट येते. तनपानास प्रोत्साहन मिळते. आईच्या अनुपस्थितीतही बाळाला आईच्या दुधासारखे पोषण मिळते.

ह्युमन मिल्क बँक ही विज्ञान, सेवा आणि मातृत्व यांचा सुंदर संगम आहे. ती म्हणजे एक जीवनदायिनी यंत्रणा आहे – बाळांच्या आरोग्याचे रक्षण करणारी!

**–युवराज पाटील**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**जळगाव**

पान १ वरून पुढे...

## नगरपालिकेचे भ्रष्ट...

आहेत मात्र याकडे लक्ष देण्यास कोणाला वेळच नसल्याने भ्रष्टाचाराचा भस्मासुर वाढलेला आहे. येणाऱ्या काळात बीड नगरपालिकेची निवडणूक होणार आहे यानंतर दोन वर्षापासून लोकप्रतिनिधी नसल्याने अधिकाऱ्यांचा प्रशासन राज नगरपालिकेवर सुरू होता लोकप्रतिनिधी आल्यास याचा जाब अधिकाऱ्यांना विचारावा लागेल. मागील दोन वर्षात झालेल्या कामांचे ऑडिट व केलेल्या कामांची यादीच नगरपालिकेने सार्वजनिक करावी यातून किती कामे खरी व किती खोटी हे बीड शहरातील प्रत्येक नागरिकाला कळेलच. बीड शहरात विकास कामांच्या नावाखाली अधिकाऱ्यांनी घातलेला गोंधळ त्यांच्या अंगलट येण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. नगर पालिका प्रशासन विभाग ते जिल्हाधिकारी तसेच विभागीय आयुक्तांकडे याची तक्रार करण्यात येणार असून उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत या सर्व तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत देण्यात येणार आहेत यासाठी काही संघटनांनी कंबर कसली असून नगरपालिकेत सुरू असलेला भ्रष्टाचार झाडापासून उघडून टाकण्यासाठी नागरिकच स्वतः तक्रारदार होणार आहेत. बीड नगरपालिकेच्या विरोधात अनेक तक्रारी मुख्याधिकाऱ्याकडे येतात मात्र त्यांच्याकडून कोणत्याच पदाधिकारी व संघटनेचे समाधान होताना दिसत नाही आपल्या अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी मुख्याधिकारी ही प्रयत्नशील आहेत का? नगरपालिकेची संपूर्ण आर्थिक चौकशी झाल्यास राज्यातील सर्वात मोठा भ्रष्टाचार बीड नगरपालिकेच्या माध्यमातून झालेला असेल. विविध योजनांखाली बीड नगरपालिकेकडून कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. या विविध खेडखाली झालेल्या निधीची चौकशी व त्या कामांची व्हिडिओ ग्राफी द्वारे चौकशी झाल्यास सत्य बाहेर येईलच. बीड नगरपालिकेचे अभिनेते किरण देशमुख व त्यांचे सर्व सहकाऱ्यांना लवकरच जे खाल्ले आहे ते शासनाला जमा करावे लागणार आहे. बीड नगरपालिकेच्या भ्रष्टाचार विरोधात तक्रारी करण्यात येणार असून अधिकाऱ्यापर्यंत तक्रारी समाधान न झाल्यास थेट मंत्रालयातच अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या विरोधात आंदोलन उभे करण्यात येणार असल्याचे अनेक संघटनांनी बोलून दाखवले आहे.

## स्थानीय गुन्हे...

ग्राहकाने दिलेल्या रक्कमेसह इशारा दिल्यावर पोलिसांनी तात्काळ छापा टाकत संबंधित महिलेला ताब्यात घेतले. तिचे नाव आशा पंडित गायकवाड (वय ४५, रा. मोतीमहल, बीड) असे असून तिच्याकडून ठरलेल्या ५०० रुपयांच्या तीन नोटा पंचांसमोर जप्त करण्यात आल्या. तपासादरम्यान आणखी दोन पीडित महिला आढळून आल्या. त्यांच्या जबाबांवरून आरोपी आशाबाई गायकवाड व तिची साथीदार कुशीवर्ता

पान १ वरून पुढे...

मोहन शिराळे (रा. धानोरा, बीड) यांनी आर्थिक फायद्यासाठी या महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेतल्याचे निष्पन्न झाले. आरोपींच्या रुममध्ये तपासणीदरम्यान णडढऊ कंपनीचे १२ विनावापर निरोधही आढळून आले. या दोन्ही आरोपींविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत कलम ३, ४, ५ व ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पीडित दोन महिलांची सुटका करून त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. शिवाजी बंटेवाड, पो.उप.नि. मुरकुटे, पो.कॉ. शिंदे, अशपाक, परझणे (स्थानीय गुन्हे शाखा), तसेच पो.उप.नि. पल्लवी जाधव व महिला पोलीस कर्मचारी उषा चौरे, शोभा जाधव, मिरा रेडेकर व अन्य पोलीस पथकाने केली.

## लैंगिक छळप्रकरणी...

घटनेचे रिक्रिएशन करणार आहेत. नेमकं प्रकरण काय? उमाकिरण शैक्षणिक संकुलात नीटची तयारी करणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थीनीचा लैंगिक छळ केल्यावरुन संचालक विजय पवार आणि शिक्षक प्रशांत खाटोकर या दोघांवर पोक्सोनुसार गुन्हा नोंद आहे. सध्या दोघेही पोलिस कोठडीत असून या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षकांकडून शिवाजीनगर ठाण्याचे पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्याकडे सोपविण्यात आला. बीड शहर पोलिस ठाण्याच्या कोठडीत रात्र घालविलेल्या पवार, खाटोकरला शिवाजी नगर पोलिस ठाण्यात आणण्यात आले. इथे दोघांचे मोबाईल ताब्यात घेतले असून त्यांचा सीडीआर तपासला जात आहे. तसेच इंटरनेटचा वापर करुन काही कृत्य केले का, याबाबत तपास अधिकाऱ्यांनी इंटरनेट वापरकर्त्यांनाही पत्र दिले आहे. दोन दिवसांची पोलीस कोठडी संपणार असून दुपारी या दोघांना न्यायालयात हजर केले जाणार आहे.

## जिल्हातिल जवळपास...

सत्य बाहेर येईल. खरोखरच जर यात नियमाप्रमाणे कारवाई झाली तर या योजनेचा खऱ्या गरजूंना लाभ मिळेल नसता मागील अनेक वर्षांपासून जी बोगसगिरी सुरू आहे तीच बोगसगिरी परत सुरू राहील.

## महिला व बालविकास...

राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील राज्यातील ज्या अंगणवाडी केंद्रांना स्वतःचे इमारत उपलब्ध नाही अशी अंगणवाडी केंद्र नजीकच्या जिल्हा

पान १ वरून पुढे...

परिषद शाळेमधील रिक्त खोल्यांमध्ये स्थलांतरित करण्यात शासनाने मंजुरी दिलेली आहे. सदरील धोरण जी अंगणवाडी केंद्र भाड्याच्या जागेत, समाज मंदिर इत्यादी ठिकाणी कार्यरत आहेत त्यांच्याकरता लागू करण्यात आले आहे. अंगणवाडी केंद्र स्थलांतरित करताना अंगणवाडीचे सध्याचे ठिकाण व जिल्हा परिषदेच्या ज्या ठिकाणच्या शाळेमध्ये अंगणवाडी स्थलांतरित करायचे आहे अशा ठिकाणांमधील अंतर हे एक किलोमीटर पेक्षा जास्त नसावे, अंगणवाडी वर्गखोली देताना शाळेमधील स्वयंपाकगृह ,स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी ,क्रीडांगण, क्रीडा साहित्य इत्यादी सुविधांचा अंगणवाडी केंद्रांमधील बालकांकरीता वापर करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. दरम्यान बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळा इमारतींची अवस्था अत्यंत वाईट आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थी उघड्यावर बसत आहेत, अनेक ठिकाणी वर्ग खोल्या कमी पडत असल्याने दोन-तीन वर्ग एकत्रित बसवावे लागत आहेत. शासनाने अंगणवाडीसाठी नवीन अध्यादेश काढून गावपतळीवर काय स्थिती आहे यापासून सरकार कोसोदुर असल्याचे दाखवून दिल्याचे दिसत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांची स्थिती- बीड जिल्ह्यात यु -डायस २०२३-२४ च्या माहितीनुसार जिल्हा परिषदेच्या २४७६ शाळा आहेत.या शाळांमध्ये १०,४७९ वर्गखोल्या असुन यातील ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन याठिकाणी अध्यापन करू नये असे शिक्षण विभागाने कळविले आहे. तसेच ७४९ वर्गखोल्यांची किरकोळ दुरुस्ती आणि ८५६ वर्गखोल्यांना मोठ्या दुरुस्तीची गरज आहे. शिक्षणावर ५ टक्के खर्च- मागील दोन वर्षात शाळांवर केलेला खर्च पाहिला तर तो तिर्थक्षेत्रांपेक्षाही कमी असल्याचे दिसून येत आहे.सन २०२३-२४ मध्ये ३०.६३ कोटी तर २०२४-२५ मध्ये ३१.८६ कोटींचा खर्च शाळांवर केलेला आहे.जिल्हा नियोजन समितीच्या एकुण खर्चापैकी ५ टक्के निधी शिक्षणावर खर्च केला जातो. ५५ कोटींचा नव्याने प्रस्ताव- ५४१ वर्गखोल्यांच्या मोठ्या दुरुस्ती करीता १३ कोटी १४ लाख ६३ हजार रूपयांचा निधी व ५१९ धोकादायक वर्ग खोल्यांच्या बांधकाम व पत्र्यांच्या शेडमध्ये भरणाऱ्या ३८ शाळांमध्ये ३८ वर्गखोल्या बांधकामासाठी असे एकुण ५५ कोटी ७० लाख रुपये निधी मिळण्यासाठी प्रशासनाकडून प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.

## आषाढी एकादशीनिमित्त...

शहर आणि परिसरातील बालकलावंत गायक तसेच नामवंत गायक अभंग गायन सादर करणार असून जवळपास ३० कलावंत या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचा लाभ बीडकर रसिक श्रोत्यांनी घ्यावा, असे आवाहन नाट्य परिषद अध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, स्नेहल पाठक, डॉ. शिवानंद क्षीरसागर, डॉ. संजय पाटील देवळाणकर, भरत लोळगे, अनुराधा चिंचोलकर, मिलिंद शिवणीकर, विलास सोनवणे,

पान १ वरून पुढे...

राहुल सोनवणे, दुष्यंत रामटेके, दीपक जमधाडे, अमित गाडे, अनिता शिंदे, नामदेव साळुंके, सुरेश साळुंके, सुरेश थोरात, विजय राख तसेच नाट्य परिषद व बालरंगभूमी परिषदेचे सदस्यांनी केले आहे.

## महाराष्ट्रात पुन्हा....

झाल्याचे समोर आले आहे. एका माजी सरपंचाची निघृण हत्या करण्यात आलेली आहे. त्यांचा मृतदेह पोलिस ठाण्याच्या भागात सापडला असून मुंडक नसलेला मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथे वंजारी समाजाचे माजी सरपंच अशोक सोनुने यांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. पोलीस स्टेशनमधून त्यांचं अपहरण झालं. त्यानंतर महिनाभर ते गायब होते. त्यानंतर आता लोणार पोलीस स्टेशनच्या एक किलोमीटरच्या अंतरावर त्याचे मुंडकं छाटलेला मृतदेह सापडला आहे.

जीवाला धोका असल्याच्या दिल्या होत्या तक्रारी!- दरम्यान त्यांनी आपल्या जीवाला धोका असल्याच्या एका वर्षात आठ तक्रारी दिल्या होत्या. त्यामुळे ते मिसिंग झाल्यानंतर पीडित कुटुंब तीन वेळा पोलीस स्टेशनला गेलं होतं. त्यांनी आरोप केल्यापैकी एक आरोपी गेल्या महिन्याभरापासून फरार आहे. किरकोळ जमिनीच्या वादातून ही हत्या करण्यात आल्याचे देखील सांगितले जात आहे. पँथर सेनेच्या नेत्यांनी मुख्यमंत्र्यांनी दिला इशारा!- याबाबत ऑल इंडिया पँथर सेनेचे नेते दीपक केदार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली. त्यांनी म्हटले आहे की, या घटनेवर विधानभवनात कोण बोलणार आहे की नाही?, गरीब वंजारा समाजाचा कुणीच वाली नाही. पोलीस अधीक्षकांनी तात्काळ या प्रकरणात गांभीर्याने चौकशी करावी. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांनी याची दखल घेत त्यामध्ये आणि सीआयडीमार्फत चौकशी करावी. त्याचबरोबर वंजारी समाजाचे नेते भाऊ-बहीणसुद्धा यामध्ये भूमिका घेतील आणि कुटुंबाला न्याय देतील.

## बीड मौलाना....

व बीड जिल्ह्यातील मौलाना आझाद महामंडळातील कर्जवाटप झाले आहे मात्र संबंधित राहिली दस्तऐवज आणि रेकॉर्ड गायब केले आहे कर्ज वाटप करणारी अधिकारी ने आपल्या नातेवाईकांना प्राधान्य दिले आहे खऱ्या गरजूंना कर्ज दिले जात नाही मौलाना आझाद महामंडळाच्या घोटाळ्याची चौकशी झाली पाहिजे नसता जिल्हाधिकारी साहेबांना भेटून निवेदन देण्यात आले आहे लवकरच या प्रकरणाची चौकशी योग्य रित्या करू असं आश्वासन दिले आहे नसता आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही असा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे बीड अध्यक्ष प्रा, सापनकर यांनी दिला आहे.

पान ४ वरून पुढे...

## स्वाराती वैद्यकीय...

आणि उपचारांची सुरुवात करण्यात आली होती. मात्र हा विभाग कालांतराने पुरेसे तंत्रज्ञ आणि अनुभवी तज्ञ डॉक्टर मिळत नसल्याने बंद करण्यात आला. सदरील विभाग बंद होवून ही आता पंचेवीस वर्षांचा कालावधी उलटून गेला असतांनाच या विभागाच्या आ. नमिता मुंदडा यांनी विधीमंडळाच्या अधिवेशनात मा. सभापती महोदयांसमोर बोलताना या विभागात अजून ही मोठ्या प्रमाणावर कॅन्सर चे रुग्ण आढळून येत असून या रुग्णांना आर्थिक परिस्थिती नसतांनाही संभाजी नगर अथवा मुंबई येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी जावे लागते असे सांगत या रुग्णांची हेळसांड थांबवण्यासाठी अंबाजोगाई येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागात पुन्हा नव्याने कॅन्सर विभाग सुरु करण्यात यावा अशी मागणी केली आहे. राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनात आमदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या वेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री व संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित असल्यामुळे या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्यात येते. या आ. नमिता मुंदडा यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नांवर संबंधित मंत्री काय निर्णय घेतात याकडे मतदार संघातील नागरीकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## वैद्यकिन्ही येथील...

कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपमुख्यमंत्री, वित्त मंत्री व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी बीडच्या विमानतळासाठी निधी देऊन चिंता करण्यापेक्षा बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी मुलभूत सुविधा द्याव्यात अशी उद्विग्न प्रतिक्रिया दिली. पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा १९५३ सालची असुन १ ते ७ वी पर्यंत वर्ग असुन एकुण पटसंख्या १३० आहे. एकुण ८ वर्गखोल्या पैकी ६

पान ४ वरून पुढे...

धोकादायक स्थितीत आहेत. कार्यालयाच्या छताचे पोपडे पडत आहेत. काल दि. ३ गुरुवार रोजी मध्यरात्री ३ वर्ग अध्यापन सुरू असलेल्या वर्गाची भिंत कोसळली. रात्री भिंत कोसळल्याने दुर्घटना टळली. दिवसा भिंत कोसळली असती तर गंभीर घटना घटली असती. विस्तार अधिकारी गटशिक्षण विभाग पंचायत समिती पाटोदा हनुमान गव्हाणे यांनी शाळेला भेट दिली.

## तलवाड्याचा कोंडवाडा...

चव्हाट्यावर आला आहे यावेळी ग्रामसेवक हजर नसल्यामुळे आक्रमक शेतकऱ्यांनी जनावरे कोंडवाड्यात टाका अन्यथा गेट उघडू देणार नाही अशी भूमिका घेतल्याने काहीकाळ मी मी म्हणणाऱ्या कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. ग्रामविकास अधिकारी यांनी तलवाडा याठिकाणी येऊन सदरील प्रश्न मार्गी लावत कर्मचाऱ्यांकडून कोंडवाडा खुला करून घेतला तेव्हा हे प्रकरण निवळले. यामध्ये दुसराच एक बाद त्याठिकाणी उद्भवला होता. तो बादही ग्रामविकास अधिकारी यांनी यांनी तलवाडा येथील काही सामाजिक काम करणारे युवक तथा तलवाडा ग्रामपंचायत चे उपसरपंच यांच्या मध्यस्थीने ते प्रकरण मिटवले. परंतु ग्रामपंचायतचा कारभार हा अत्यंत भ्रष्टयुक्त आणि अनियमितपणे चालत असल्याने याठिकाणी नव्याने आलेले ग्रामविकास अधिकारी आणि प्रशासक हे सुधारतील का हे येणाऱ्या काळात पहावे लागणार आहे. सध्या तलवाडा ग्रामपंचायतचा कारभार म्हणजे आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातयं याप्रमाणे सुरू असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

## काँग्रेस पक्षाच्या....

तालुका व मतदार संघात काँग्रेस पक्षाला निश्चित बळकटी मिळेल. त्यांच्या निवडीबद्दल त्यांना लोकनेत्या खासदार रजनीताई पाटील, माजी

पान ४ वरून पुढे...

मंत्री अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे पाटील यांच्यासह विविध पक्ष संघटनेसह अनेक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

## खा.बजरंग सोनवणेंच्या...

डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रूग्णालय बीड यांनी सर्व वैद्यकिय अधिक्षकांना याबाबत पत्र दिले आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करयात येते. यामध्ये ० ते ६ वर्षे वयोगटातील अंगणवाडीमध्ये जाणाऱ्या बालकांची वर्षातून २ वेळा तर शासकीय आणि निमशासकीय शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते. दरम्यान, दि.६ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमीत्त संपूर्ण बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीने वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाशी संपर्क करण्यात येत असून संबंधीत शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत जनजागृती करावी, असेही डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय, यांनी म्हटले आहे. दरम्यान, यासाठी तालुकास्तरावर नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. वैद्यकिय अधिक्षक, सर्व जिल्हा/ उप जिल्हा/ ग्रामिण रुग्णालय, यांना पत्र पाठवून आपल्या अधिनस्त आरबीएसके अंतर्गत सर्व वैद्यकिय पथकांना सज्ज ठेवून आरोग्य तपासणी करावी, असे आदेश दिले आहेत.

## राजमाता जिजाऊ...

राबविण्यात येत आहे. सदरील कोर्स करिता माजी विद्यार्थी श्री. आश्विन गुळवे व श्री. गणेश कापसे हे या कोर्सचे प्रशिक्षक म्हणून कार्य करत

पान ४ वरून पुढे...

आहेत. सध्या शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना हा कोर्स पूर्णतः मोफत शिकवणार आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल ज्ञानाची संधी मिळावी या हेतूने महाविद्यालयाने हा उपक्रम सुरू केला आहे. महाविद्यालयामध्ये या कोर्सची सुरुवात झाली असून इच्छुक विद्यार्थ्यांनी नाव नोंदणीसाठी हिंदी विभागतील डॉ. नितीन कुंभार यांच्याशी संपर्क साधावा. या कोर्स साठी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेशित होऊन या मौल्यवान संधीचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी केले आहे. सदरील कोर्समध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे प्राचार्यांनी अभिनंदन करून सदिच्छा व्यक्त केल्या.

## घारगाव रस्त्याच्या...

त्यांनी गावातल्या काही लोकांना मदतीसाठी बोलावले. गावकर्यांनी धाव घेत गायीची सुटका केली. गायीला गाळातून बाहेर काढण्यासाठी तब्बल आठ तास लागले. या सार्या घटनेने ढास कुटुंबाला मोठा मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागला. ही घटना ऐकून गावकर्यांनी संताप व्यक्त केला असून घारगाव ते लिंबागणेश रस्त्याच्या तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे. गावकर्यांचे म्हणणे आहे हा रस्ता आमच्या शेतीसाठी अत्यावश्यक आहे. मात्र अनेक वर्षांपासून दुर्लक्षित आहे. पावसाळ्यात तर या रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट होते. जनावरं, शेतकरी आणि वाहनधारक सगळेच अडचणीत येतात. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. सदर घटना प्रशासनाला डोळे उघडणारी ठरावी अशी अपेक्षा गावकर्यांनी व्यक्त केली आहे.

शेतकर्यास नुकसान भरपाई द्यावी- सदरील गाय गंभीर असून, ती शेवटच्या घटका मोजत आहे. यामुळे दुभती गाय मरणाच्या दारावर असल्याने शेतकर्याचे नुकसान झाले आहे. प्रशासनाने याचा पंचनामा करुन नुकसान भरपाई द्यावी अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शिंदे वस्ती(गोपळखीळा)शेतरस्त्यांचा पंचनामा : महसुल अभिलेखात नोंदनीचा मार्ग मोकळा

**शिरूर । प्रतिनिधी**

सर्वांसाठी शेत रस्ता या मागणीसाठी शिवश्री कृषिमंडळ हिवरसिंगा चे अध्यक्ष शिवराम राऊत यांच्या वतीने अनेक वर्षापासुन प्रचलित व प्रत्यक्ष वापरातील शेत रस्ते, गाडीरस्ते, पायवाट,वस्ती रस्ते,पांदन रस्ते,शिवरस्ते यांची महसुली अभिलेखात नोंदनी करुन गावनकाशात प्रमाणित (समाविष्ट) करणे या मागणी नुसार शिरूर चे मा.तहसिलदार साहेब सुरेश जी घोळवे साहेब यांच्या आदेशान्वये महसुल प्रशासन व ग्राम पंचायत हिवरसिंगा यांच्या ग्राम रस्ता समिती



यांच्या संयुक्तपणे प्रा.जि.मा.१९ पासुन पश्चिम कडे शिंदे वस्ती (गोपळखीळा) कडे जाणारा प्रचलित व अनेक वर्षापासुन वापरातील असणारा शेत रस्ता महसुली अभिलेखात नोंदनी करून गाव नकाशात व ग्रामीण मार्ग म्हणून ग्रामीनविकासात नोंदनी करण्यासाठी ज्ञानोबा शिंदे,शिवाजी शिंदे,सतिश शिंदे, निवृत्ती शिंदे,उमेश शिंदे,शंकर शिंदे,सह सर्व शेतक-यांच्या मागणीस्तव शहादेव सानप (मंडळ अधिकारी) गणेश बडे( तलाठी) ज्ञानदेव सानप( पं.स.सदस्य शिरूर ) भिमराव सानप (तंटामुक्त समिती अध्यक्ष) शिवराम राऊत,रामेश्वर पांडुळे,नारायण गीरी सर यांच्या सह ग्राम रस्ता समिती पदाधिकारी यांनी प्रा.जि.मा.१९ पासुन ते शिंदे वस्ती पर्यंतचा शेत रस्ता प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन पाहणी केली त्या नुसार स्थळपाहणी अहवाल तयार करून शेत रस्ता ज्या-ज्या गटातून जात आहे त्या गटाच्या इतर हक्कात नोंद करण्यासाठी मा.तहसिलदार साहेब यांच्या पटलावर सादर करुन पुढील नियोमोचित कार्यवाही करून शिंदे वस्ती (गोपळखीळा) मधील सर्व शेतक-यांच्या अनेक वर्षापासुन प्रलंबित आसणा-या मागणीतून शेत रस्ता ग्रामीण मार्गात नोंद होण्याची प्रारंभीक स्थिती पार पडल्याने सदरिल शेत रस्ता हा विकसित होणार आसल्याने शेतक-यांनी समाधान शिवश्री कृषिमंडळ व ग्रामरस्ता समिती हिवरसिंगा व महसुली प्रशासनाचे आभार मानले.तसेच मौ.हिवरसिंगातील शेतक-यांनी आप-आपल्या शेतरस्त्याच्या समस्या मा.तलाठी यांच्या मार्फत ग्राम रस्ता समिती हिवरसिंगा यांच्याकडे देऊन शेत रस्ता खुला करणे,त्याची पाहणी करून अभिलेखात नोंदनी करण्यासाठी पुढे यावे असे मत शिवराम राऊत यांनी व्यक्त केले.

# 'हाजी असरार' भाईनी वॉर्डचा केला कायापालट

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील वार्ड क्रमांक १७ अजित पुरा या भागात एक गल्लीत गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून रखडलेली होती. मात्र या गल्ली नालीचा त्रास गल्लीतल्या राहणाऱ्या माणसाला खूप त्रास सहन करावा लागत होता. येथील बीड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट, योगेश भैया क्षीरसागर यांचे कार्यकर्ते (समाजसेवक) हाजी शेख असरार यांना गल्लीत राहणाऱ्या लोकांनी सांगितले की आम्हाला ह्या गल्लीत तुंबलेले पाणी आणि पावसात नालीत जमलेले गडूळ पाणीच्या खूप त्रास सहन करावा लागते असा लोकांनी शेख असराल यांना सांगितले. आम्ही नगरपालिकांना अनेक वेळेस निवेदन पण दिले पण त्यांनी काहीच केलं नाही फक्त आम्हाला त्यांनी सांगितलं की आम्ही करून घेऊ पण आता पाऊस सुरू होणार आहेत आणि तो नालीतला पाणी आमच्या घरात घुसणार. असा गल्लीतले राहणाऱ्या



माणसांनी त्यांना सांगितले. हाजी असरार भाई यांनी तो समस्या मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब (संपादक) व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी ती गल्ली कमीत कमी तीन ते चार दिवसांमध्ये सिमेंट कॉंक्रेट गल्ली संपूर्ण करून दिली आणि नळाचे पाईप पण लावून दिले. आणि आसरार भाई यांनी ते लोकांचे समस्या पूर्ण करण्याच्या प्रयत्न केला आणि त्या प्रयत्नात त्यांना यश मिळाले. गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून रखडलेली तो



गल्ली डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर यांचे कार्यकर्ते हाजी शेख असरार (समाजसेवक) यांनी तो प्रश्न मिटवला. आणि लोकांना तो गल्ली बनवून दिली त्यात डॉक्टर योगेश भैया क्षीरसागर यांचे आणि हाजी असरार भाई यांचे आभार मानले. बीड शहरात वार्ड क्रमांक १७ मध्ये अनेक नाल्या गल्ल्या आणि रस्ते यांनी चांगलेच केले मात्र त्यांनी त्याच्या अगोदर उद्घाटन केला नाही त्यांनी त्याच्या उद्घाटन सगळं काम संपल्यानंतर केले.. कारण त्यांनी सांगितले की, आम्ही दुसऱ्या सारखा आधी उद्घाटन करत नाही आम्ही विकास काम केल्यानंतर तो कामाच्या उद्घाटन करतोय...

### ● नागरिकांनी असलार भाई यांचे मानले आभार

**प्रभाग क्रमांक जुना १५ नवीन १७ अजीज पुरा येथील डॉक्टर साबेर अली गल्ली येथे मॉडेल शाळा समोरील नाली व रस्त्याचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता. या भागातील नागरिकांची अनेक दिवसापासूनची ही मागणी होती की या नाली व रस्त्याचा प्रश्न मार्गी लागावा म्हणून हा प्रश्न समाजसेवक मोह्म्मद असरार यांनी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब साहेब व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधान सभा अध्यक्ष डॉक्टर योगेश भैया क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली राखडलेला रोड व नाली काँक्रीट काम करून दाखवला कायमचा प्रश्न मार्गी लावला व येथील नाली व रस्त्यचा काम करून घेतले.काम झाले नंतर ते गल्लीत ले नागरिकांनी मोहम्मद असरार यांचे आभार मानले व सत्कार केले आणि वचन दिले आम्ही तुमचे सोबत आहे त्या वेळी हाजी अय्युब साहब, मोलाना सलमान,अखिल सर, मोमीन जावेद,मोमीन सईद,मोमीन रिझवान,मोमीन कमरान,शेख मतीन भाई,पापा भाई,बिलाल भाई,शेख आरेफ भाई,जफर भाई,उपस्थित होते.**

वेल्डाण असरार भाई. खरा जे कुणाला जमला नाही ते योगेश भैया क्षीरसागर यांचे कार्यकर्ते (समाजसेवक) हाजी असरार शेख यांनी करून दाखविले. विकासाच्या संदर्भात (आम्ही बोलत नाही आमच्या काम बोलतोय..) असा त्यांनी सांगितले. आणि तो गल्ली नाली त्यात गल्लीत राहणारा माणसाला करून दिला त्या माणसांनी त्यांच्या आभार व्यक्त केले आणि त्यांना सांगितले खरं असरार भाई तुम्ही आमचे मनातले नगरसेवक आहात.

# रिक्षा चालकाचा प्रामाणिक पणा;

## पॅसेंजर महिलेचा विसरलेला मोबाईल केला परत

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील आरफत नगर येथील रहिवासी शेख नादान शेख इब्राहिम या अमजत पठाण यांच्या आटो रिक्षातून बसस्टँड कडे येत असताना त्याचा मोबाईल चुकून रिक्षात राहिला हे जेव्हा आटो चालक अमजत पठाण यांच्या निदर्शनास आले त्या वेळेस त्यांनी सदरील महिलेचा मोबाईल फोन घरी जाऊन त्यांच्या स्वाधीन केला

आज काल माणसाकडे वेळ नाही त्या मुळे प्रत्येक माणसाला घाई आहे घाईघाईत प्रवास करत असताना आपल्या जवळच्या अनेक महागड्या वस्तू कधी हरवतात तर प्रवाशी वाहनात विसरतात हे नेहमी आपल्या पाहण्यात येते त्या वस्तू परत मिळणं कठीणच ! पण आजून ही इमानदार लोकांची कमी नाही हे शहरातील रिक्षा चालक अमजत



(अनुभाई) पठाण यांनी दाखवून दिले त्याचे झाले असे की पठाण हे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी मागच्या अनेक वर्षांपासून माजलगाव शहर व परिसरात रिक्षा चालवतात ते नेहमी प्रमाणे काल सकाळी ११ वाजता आपली रिक्षा घेऊन बाहेर आले त्यांना शहरातील आरफात नगर येथील शेख नादान शेख इब्राहिम या एक महिला प्रवाशी ची सवारी बस स्टँड पर्यंत मिळाली आणि त्यांना त्यांच्या जायच्या ठिकाणी सोडण्यात आले त्या घाई गडबडीत आपला महागडा मोबाईल रिक्षा विसरल्या काही वेळाने रिक्षा चालक पठाण यांच्या ते लक्षात आले त्या महिलेचा शोध घेऊन तो सापडलेला मोबाई शेख नादान याना सुपूर्द केला त्यांनी रिक्षा चालक पठाण यांचे आभार व्यक्त केले आजून ही या जगात इमानदार लोकं आहेत हे पठाण यांच्या वागण्यातून दिसून आले.

# प्रियल नितीन धांडेची अबॅकस ऑर्गनायझेशन कौन्सिलच्या जागतिक चॅम्पियनशिपसाठी निवड



**बीड । प्रतिनिधी**

गणितामधील सखोल माहिती देण्यासाठी आणि अबॅकस मधील सर्वोत्कृष्ट विश्वासपात्र सेंटर म्हणजे एम सी पी आय अबॅकस आणि वैदिक मॅथ स्टडी सेंटर असून विद्यार्थ्यांची गणितीय तयारी करण्यासाठी अबॅकसला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे असे प्रियल धांडेच्या वडिलांनी महत्त्व सांगितले आहे . शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. दिनांक २४ जून २०२५ मध्ये झालेल्या सेकंड लेवल स्तरावरील अबॅकस परीक्षेमध्ये प्रियल नितीन धांडेने ऐतिहासिक यश संपादन केलेले आहे. प्रियल नितीन धांडेने फक्त दहा मिनिटांमध्ये साठ प्रश्न सोडवल्यामुळे

*सर्वोत्कृष्ट प्रथम चॅम्पियनशिप-चॅम्पियन* निवड झाली असून शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे सत्कार करण्यात आलेला असून ऑगस्ट २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या अबॅकस असोसिएशन स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपसाठी प्रियल नितीन धांडेची निवड करण्यात आलेली आहे. वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, तैवान, चीन, जपान, सिंगापूर अशा जगातील ११ देशातील १५५० एकूण विद्यार्थ्यांपैकी सहभाग घेणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये प्रियल नितीन धांडेची जागतिक स्तरावर निवड झालेली आहे. इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये ब्रेन किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी तसेच अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यार्थ्यांचे प्रथम यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये अबॅकस मास्टर ट्रेनर डॉ घोडके ए एस प्रियलचा सत्कार करून प्रियल नितीन धांडेची गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न केल्यामुळे यश मिळालेले आहे असे प्रियल धांडेच्या आई - वडिलांनी यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

**● शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास तसेच विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस ए यांनी सांगितले आहे**

# शांताई अर्बन चा चतुर्थ वर्धापन दिन उत्साहात साजरा

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला

**बीड । प्रतिनिधी**

शांताई अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीचा चतुर्थ वर्धापन दिन ४ जुलै रोजी उत्साहात व दिमाखात साजरा करण्यात आला. या वेळी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले.



कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. विजयराज बंब ,मा. डॉ. प्रफुल्ल सुस्कर, ,मा. श्री. श्याम अरुण डाके सर यांची उपस्थिती लाभली. दीप प्रज्वलन झाल्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. पालक व शिक्षकांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.तसेच संस्थेच्या पायाभरणीत मुख्य वाटा असलेल्या पिग्मी एजंटचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थेचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे यांनी प्रस्तावना सादर करत पाहुण्यांचे स्वागत केले. त्यांनी संस्थेच्या चार वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला व सभासद, संचालक, कर्मचारी आणि हितचिंतकांचे आभार मानले. प्रमुख पाहुणे विजयराज बंब आपल्या भाषणातून शांताई अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या पारदर्शक व समाजाभिमुख कामकाजाचे कौतुक केले. ही संस्था केवळ आर्थिक सेवा पुरवणारी न राहता समाजाला दिशा देणारी प्रेरणास्थान बनत आहे, असे गौरवोद्गार व्यक्त करण्यात आले.

डॉ.सुस्कर यांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर शिंदे सर यांच्या संस्थेची वाटचाल त्यांच्या कार्याचे कौतुक केले व त्यांना पुढील विकास कामासाठी शुभेच्छा दिल्या. श्याम डाके सर यांनी शांताई अर्बनच्या विविध उपक्रमाचे कौतुक करून पारदर्शक व्यवहार करणाऱ्या संस्थेस पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे आभार प्रा.पी. जी.पोळ यांनी केले कार्यक्रमाचे सूत्र संचालन शिरापूरकर ताई नी केलें. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष संदीपजी वाघमारे सर राजेश काळे, व ,परमेश्वर शिंदे, राहुल बोराडे तसेच संचालक मंडळ नितीन जाधव,कैलास लांडे, साईनाथ वाघमारे व कर्मचारी सभासद ठेविदार हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# गंगा माऊली शुगरचा मिल रोलर पूजन कार्यक्रम संपन्न

**केज । प्रतिनिधी**

शहरालगत असलेला गंगा माऊली शुगर कारखान्याचे मिल रोलर पूजन चेअरमन लक्ष्मणराव मोरे,युवा नेते आदित्य पाटील, व्हाईस चेअरमन हनुमंत मोरे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, गंगा माऊली शुगरचे संचालक प्रवीण मोरे, संचालक अविनाश मोरे,काँग्रेसचे युवा नेते पशुपतीनाथ दांगट, आप्पासाहेब ईखे,प्रविणकुमार शेप,बाळासाहेब ठोंबरे,मुन्ना ठोंबरे,कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी आय मुजावर,मुख्य शेतकी अधिकारी अविनाश आदनाक आदींच्या हस्ते रोलर पूजन झाले. पुढील हंगाम गाळपासाठी पूजन कार्यक्रम घेऊन सुरुवात करण्यात आली. पुढील हंगामात साखर कारखाना गाळपाचा अधिकचा टप्पा पूर्ण करेल असे मत आदित्य पाटील यांनी बोलतांना व्यक्त केले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विश्वास आणि हमीभाव याबाबबत आम्ही शब्दबद्ध आहोत.कॅपिसिटी वाढवण्यासाठी गतीने प्रयत्न सुरू आहेत असे मत हनुमंत काका मोरे यांनी व्यक्त केले. रोलर पूजन कार्यक्रमास परिसरातील नागरिक, कारखान्याचे कर्मचारी उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. कतिका एस.खांडरे ३ रे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १०६३/२०२५**

**लक्ष्मणराव विष्णुपंत काळे वि. निरंक**

ज्यापेक्षा विष्णु उर्फ विष्णुपंत पि. रामभाऊ काळे, हे दिनांक ३१.०७.१९९९ रोजी मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत. आणि तसेच अर्जदार

१. लक्ष्मणराव पि. विष्णुपंत काळे, वय- ५४ वर्षे, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड

२. रामेश्वर पि. विष्णुपंत काळे, वय - ५२ वर्षे, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड अर्जदार १ व २ हे **मयत नामे विष्णु उर्फ विष्णुपंत पि. रामभाऊ काळे,** यांचे मुले आहेत. तसेच मयताची पत्नी नामे तान्हाबाई भ्र. विष्णु उर्फ विष्णुपंत काळे या अंदाजे ३० वर्षापुर्वी मयत झालेल्या आहेत. तसेच मयताचे आई-वडील हे ब-याच वर्षापुर्वी मयत झाले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचं म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत विष्णु उर्फ विष्णुपंत पि. रामभाऊ काळे, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख १४/०८/२०२५ आहे.**

आज दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**(अॅड. जी.बी. कोल्हे यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा.श्री कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १०२१/२०२५**

**सुनिता व इतर वि. निरंक**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदार: १) सुनिता भ्र. आश्रुबा निर्मळ, वय: ५२वर्षे, धंदा घरकाम, रा. नेकनुर ता. जि. बीड, २) सागर पि. आश्रुबा निर्मळ, वय: २८वर्षे, ३) पुनम पि. आश्रुबा निर्मळ, वय: ३२ वर्षे,धंदा : मजुरी, रा. वरील प्रमाणे, धंदा : मजुरी, रा. वरील प्रमाणे, ४) रेणुका भ्र .प्रविण झिगे, वय: २६ वर्षे, धंदा घरकाम, रा. दाभरूळ (एकतुणी), ता. जि. छ. संभाजीनगर

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत **नामे आश्रुबा पि.शंकर निर्मळ, राहणार नेकनुर, ता. जि. बीड हे दिनांक १५/०६/२०२५ रोजी नेकनुर ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नीं असुन अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आणि अर्जदार नं ३ व ४ मयताचे मुले आहेत व अर्जदार नं. ४ ते ७ ह्या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आईवडील या पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे आश्रुबा पि.शंकर निर्मळ, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत आश्रुबा पि.शंकर निर्मळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०८/२०२५ आहे.**

आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ श्री. शिंदे एस. बी.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए. बी. निवारे ११ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज १०१५/२०२५**

**सरोज विरुध्द निरंक**

अर्जदार :- (१) सरोज रमेश बागडे, वय ६३ वर्ष, धंदा घरकाम, रा. विद्यानगर पुर्व, बार्शी रोड, बीड, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सोनल रमेशराव बागडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत सोनल रमेशराव बागडे यांचा मृत्यु दि. ३०/०४/२०२५ रोजी नवजीवन हॉस्पीटल, बीड, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार ही मयताची आई आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सोनल रमेशराव बागडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३० माहे जून २५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख. दि. १२ ऑगस्ट २०२५.**

**(अॅड. जी. पी. शिंदे)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

दैनिक मराठवाडा पत्र
● https://marathwadapatra.com
शनिवार, दि.०५ जुलै २०२५ पान ४

## जिल्ह्यात ३७ (१) (३) लागू

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, यासाठी महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) कलम ०७ जुलैच्या मध्यरात्रीपर्यंत लागू करण्यात आले आहे. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणुका व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका- यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकीस लागू राहणार नाही व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अंमलात राहणार नाही. तसेच या आदेशाचे पालन करुन कोणाताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका- यांची पूवर्मान्यता घेणे आवश्यक असेल असेही आदेशात अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी नमूद केले आहे.

# स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात कॅन्सर विभाग पुर्ववत सुरु करा

### आ. नमिता मुंदडा यांनी केली मागणी



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात कॅन्सर विभाग पुर्ववत सुरु करण्यात यावा अशी मागणी आ. नमिता मुंदडा यांनी विधीमंडळाच्या अधिवेशनात केली आहे.

राज्यातील विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सध्या राज्य विधीमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात राज्यातील प्रत्येक आमदार आपल्या मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न अधिवेशनात विधिमंडळ सभापतींच्या समोर मांडुन ते मार्गी लावण्याचा प्रयत्न करीत असतात. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय हे आशिया खंडातील एकमेव ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आहे. या वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या माध्यम ातून मराठवाड्यातील ग्रामीण भागातील रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा राज्य शासन सातत्याने प्रयत्न करीत असते. याच उद्देशाने या वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात या विभागातील कॅन्सर रोगाने ग्रस्त झालेले अनेक रुग्ण आढळून येत असल्यामुळे सुमारे पंचेवीस वर्षांपूर्वी या वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागात कोट्यवधी रुपये खर्चून स्वतंत्र कॅन्सर विभाग निर्माण करण्यात येवून या विभागात रोग निदान ▶▶ उर्वरित पान २ वर

# वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची भिंत कोसळली

### • रात्री कोसळल्याने दुर्घटना टळली

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची भिंत कोसळली. भिंत रात्री कोसळल्याने दुर्घटना टळली. त्यामुळे तिसरी वर्गातील मुलांचा वर्ग आज झाडाखाली भरविण्यात आला होता. गेल्या ४-५ वर्षांपासून सातत्याने शिक्षण विभागाला पाठपुरावा करूनही शाळेच्या नविन बांधकाम ईमारतीसाठी निधीची तरतूद न केल्याने सरपंच अतुल मकाळ यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली. पालक घडलेल्या घटनेमुळे भयभीत झाले असुन मुलांना शाळेत पाठवावे की नाही या चिंतेत आहेत. सामाजिक ▶▶ उर्वरित पान २ वर





▶ १९५३ सालची शाळा असल्याने शाळेच्या ईमारतीची दुरावस्था झालेली आहे. शाळेच्या कार्यालयाच्या छताचे पोपडे कोसळुन लोखंडी गज ऊघडे पडलेले आहेत. ४-५ वर्षांपासून वारंवार शिक्षण विभागाकडे शाळेच्या नविन ईमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा म्हणून पाठपुरावा केला आहे मात्र शासन आणि प्रशासनाला याचे गांभीर्य दिसून येत नाही. सध्या तिसरीचा वर्ग झाडाखाली भरविण्यात आला असुन एक दोन दिवसात ग्रामपंचायत कार्यालयात त्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. हा मुलांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार अत्यंत दुर्दैवी असल्याचे गावचे सरपंच अतुल मकाळ यांनी सांगितले.

▶ रात्री घडलेल्या घटनेमुळे मुलांना शाळेत पाठवायची भिती वाटते. माझे शिक्षण याच शाळेत झाले आहे. शासनाचे सरकारी शाळांकडे दुर्लक्ष असल्याने पालकांचा ओढा खाजगी शाळेकडे वळला आहे. शासन आणि प्रशासनाने लक्ष देण्याची गरज असल्याचे पालक डॉ. सारीका माने यांनी सांगितले.

▶ बीड जिल्ह्यातील ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन विद्यार्थ्यांना त्यात अध्यापन करू नये अशा शिक्षण विभागाने सुचना दिलेल्या आहेत. परंतु नाईलाजाने विद्यार्थी आणि शिक्षक जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करत आहेत. पालकमंत्री अजितदादा पवार यांनी ५७५ कोटींचा निधी जिल्हा नियोजन विभागांसाठी मंजुर केला आहे परंतु अद्याप दिला नाही. मोडकळीस आलेल्या शाळांच्या ईमारतीसाठी निधी देण्याऐवजी विमानतळ बांधण्यासाठी अजितदादा आग्रही असुन त्यांनी ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# काँग्रेस पक्षाच्या बीड तालुकाध्यक्षपदी गणेश बजगुडे पाटील यांची फेर निवड



**बीड । प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस कमिटीच्या महासचिव राज्यसभा खासदार रजनीताई अशोकराव पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या नेतृत्वात जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी काल दिनांक २१ जुन २०२५ रोजी बीड जिल्ह्यातील ११ तालुकाध्यक्षांच्या निवडी जाहीर करुन नियुक्तीपत्र देण्यात आले. यामध्ये बीड तालुका कॉंग्रेस अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा एकदा गणेश दादा बजगुडे पाटील यांना देण्यात आली. गणेश बजगुडे पाटील हे मागील अनेक वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणारे सर्वपरिचित धडाडीचे नेतृत्व असुन मागील कार्यकाळात पक्ष संघटनेसाठी केलेल्या कामाची दखल घेत त्यांची पुन्हा एकदा भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस कमिटीच्या बीड तालुकाध्यक्षपदी निवड करत नियुक्तीपत्र देण्यात आले. ही निवड योग्य व सर्व सामान्य कार्यकर्त्यांना बळ देणारी असुन पक्ष संघटन वाढीसाठी महत्वाची ठरणार आहे. कर्तृत्व, दातृत्व व वक्तृत्वाचा त्रिवेणी संगम व तालुक्यातील वाडी वस्ती गाव खेड्यांपर्यंत असलेला प्रत्यक्ष संपर्क तालुकाभरात सर्वपरिचित व पुर्णवेळ लोकांसाठी उपलब्ध असणाऱ्या या नेतृत्वामुळे बीड ▶▶ उर्वरित पान २ वर

### ▶ प्रामाणिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना कॉंग्रेस पक्षातच न्याय मिळतो :गणेश बजगुडे पाटील

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या बीड तालुकाध्यक्षपदी गणेश बजगुडे पाटील यांची फ रनिवड झाल्यानंतर बोलताना गणेश बजगुडे पाटील म्हणाले की, मी मागील तीन वर्षाच्या तालुकाध्यक्ष पदाच्या कार्यकाळात प्रामाणिकपणे केलेल्या कामाची पावती म्हणुन माझे नेते माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब, खासदार रजनीताई अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी माझ्यावर ज्या विश्वासाने पक्ष संघटन वाढीसाठी पुन्हा एकदा बीड तालुकाध्यक्ष पदाची अतिशय महत्वाची जबाबदारी दिली त्या विश्वासाला कधीही तडा न जावु देता बीड तालुक्यातील सर्व जुन्या नव्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन पक्ष संघटन वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न करेल. त्याच बरोबर आगामी काळात होवु घातलेल्या सर्व जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका देखील आम्ही ताकतीने लढू आणि जिंकू असे कॉंग्रेसचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी सांगितले.

# तलवाड्याचा कोंडवाडा बंद असल्याचे शेतकरी आक्रमक; ग्रामपंचायतीच्या गेटला बांधली जनावरे

### ग्रामविकास अधिकारी यांचा इशारा मोकाट जनावरे सोडु नका नसता कारवाई होईल यांची नोंद जनावरांच्या मालकांनी घ्यावी

**तलवाडा । प्रतिनिधी**

मोकाट जनावरांना आळा घालण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर कोंडवाडा असतो. परंतु तलवाडा ग्रामपंचायतचा जनावरांचा कोंडवाडा मागील काही वर्षांपासून बंद असल्याने मोकाट जनावरे कोठे कोंडावीत असा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा होता. अनेकवेळा हि जनावरे शेतकऱ्यांनी पकडून सोडून दिली. परंतु उभ्या पिकाची नासाडी होत असल्याने मोठी आर्थिक झळ त्यांना बसत होती. याकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे लक्ष नसल्याने यावर काहीच कार्यवाही



होत नव्हती. हि बाब वारंवार शेतकऱ्यांनी ग्रामविकास अधिकारी आणि सरपंच यांच्या निर्देशनास आणून दिली. परंतु काहीच फरक पडला नसल्याने गुरूवार दि.०३ जुलै रोजी एका शेतकऱ्याने शेतातील पिकाची नासाडी केलेल्या मोकाट जनावरांना पकडून त्यांना ग्रामपंचायतसमोर आणले. परंतु कोंडवाडा बंद असल्याने आक्रमक झालेल्या

शेतकऱ्याने म्हशीचे बगारू चक्क ग्राम पंचायत कार्यालयाच्या गेटलाच बांधल्याने ग्रामपंचायत प्रशासनाचा कारभार पुन्हा एकदा ▶▶ उर्वरित पान २ वर

# खा.बजरंग सोनवणेंच्या वाढदिवसानिमीत्त जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची होणार आरोग्य तपासणी

### राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, जि. शल्यचिकित्सक यांचे वैद्यकिय अधिक्षकांना पत्र



### ▶ या कार्यक्रमांचाही समावेश

केज शहर: उपजिल्हा रुग्णालय, केज येथे रुग्णांना साडी वाटप, फळ वाटप, बालाजी मंदिर येथे आरती, दर्गा येथे चादर अर्पण करणे, वयोवृद्ध आश्रम येथे किट वाटप, शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, शेतकरी महिलांचा सन्मान असे विविध कार्यक्रम. रक्तदान शिबीर: येडेश्वरी कारखाना आनंदगाव सा, आष्टी, पाटोदा, अंबाजोगाई, घाटनांदूर, धारूर, वाघोली, सिरसाळा. इतर सामाजिक उपक्रम: बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात शालेय साहित्य वाटप, फळ वाटप, वृक्षारोपण, फराळीचा कार्यक्रम होणार आहे.

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे खा.बजरंग सोनवणे यांचा वाढदिवस दि.६ जुलै रोजी जिल्हाभरात विविध कार्यक्रमांनी साजरा केला जात आहे. तालुकास्तरावर राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने रक्तदान शिबीरांचे आयोजन केले आहे. दरम्यान, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम ांतर्गत अंगणवाडी ते बारावीपर्यंत विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे.

खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्याबाबत ▶▶ उर्वरित पान २ वर

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये मोफत डिजिटल प्रोडक्टिव्हिटी कोर्स



**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये युनिसेफ (UNICEF) तर्फे Digital Productivity Course हा उपयुक्त कोर्स म हाविद्यालयात विद्यार्थ्यांकरीता मोफत सुरू करण्यात आला आहे. महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघाच्या पुढाकाराने हा उपक्रम ▶▶ उर्वरित पान २ वर







*बीड: मागील सहा महिन्यात वेळोवेळी अवैध सायलेन्सर कारवाई करण्यात आली होती जे सायलेन्सर आवाज करणारे व मॉडिफाइड केलेले सायलेन्सर होते ते बुलेट चे सायलेन्सर काढून घेण्यात आले होते सदर काढून घेण्यात आलेले सायलेन्सरवर माननीय पोलीस अधीक्षक नवनीत कुवत यांच्या मार्गदर्शनाखाली व अप्पर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर तसेच प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक श्रीमती पूजा पवार यांचे उपस्थिती जिल्हा वाहतूक शाखाप्रमुख सुभाष सानप व त्यांचे पीएसआय जाधवर, पोलीस अंमलदार विष्णू काकडे ,आजिनाथ बांगर ,त्रिंबक कुडके, राहुल घाडगे, विश्वजीत वाघमारे, दत्ता कदम, तसेच इतर अधिकारी अंमलदार यांनी केले आहे.*

# घारगाव रस्त्याच्या दुरवस्थेमुळे शेतकऱ्यांची मोठी अडचण; गाय गाळात अडकली, ८ तासांनंतर सुटका

### ▶ गावकर्यांची मागणी- घारगाव ते लिंबागणेश शिव रस्ताची तातडीने दुरुस्त करावा

**घारगाव । प्रतिनिधी**

मौजे घारगाव ते लिंबागणेश या शिव रस्त्याची दुरवस्था आणि दुरुस्ती अभावी शेतकर्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा



लागत आहे. या निकृष्ट रस्त्याम ुळे नुकतीच एक गंभीर घटना घडली आहे. शेतकरी भालचंद्र माणिकराव ढास यांच्या म ालकीची गाय चिखलात अडकली आणि तब्बल आठ ते नऊ तास गाळात फसून राहिली.

रस्ता खराब असल्यामुळे शेतात जाणे कठीण झाले असून, याच पार्श्वभूमीवर सदर घटना घडली. ढास दांपत्य आपल्या गायीसह शेतात गेले होते. रात्रीच्या वेळेस गाय अचानक चिखलात फसली. अंधारामुळे व रस्त्याच्या अडचणीमुळे कुणालाही कल्पना येऊ शकली नाही. शेतकरी आणि गाय घरी परत न आल्याने त्यांच्या घरच्यांनी शोध घेतला असता ही बाब उघड झाली. भालचंद्र ढास आणि त्यांच्या पत्नीने गायीला बाहेर काढण्याचा खूप प्रयत्न केला, मात्र गाळ घट्ट झाल्यामुळे त्यांना यश आले नाही. अखेर ▶▶ उर्वरित पान २ वर